Email – addlcp.traffic@mahapolice.gov.in
दूरध्वनी क्रमांक – ०२२-२४९२४७३४

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
मुंबई पोलीस



अपर पोलीस आयुक्त, वाहतूक, बृहन्मुंबई यांचे कार्यालय

वाहतूक पोलीस मुख्यालय, ८७, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई – ४०००३०.

जा. क्र. - २७२ /अपोआ/वाहतूक/वा./कायमस्वरूपी अधिसूचना/२६, दिनांक – १२ /११/२०२६

कायमस्वरूपी अधिसूचना / आदेश

अधिसूचना क्रमांक - २२८ /अपोआ/वाहतूक/वा./कायमस्वरूपी अधिसूचना/२६, दिनांक – १२ /११/२०२६

ज्याअर्थी, समता नगर वाहतूक विभागाच्या हद्दीतील ठाकूर कॉम्प्लेक्स जंक्शन ते गौरव स्वीट्स हॉटेल, ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली (पूर्व), मुंबई या दोन महत्त्वाच्या जंक्शनदरम्यानचा अंदाजे ८० मीटर लांबीचा रस्ता अत्यंत अरुंद असून सदर रस्त्याला तीव्र वळण आहे. सदर रस्ता ठाकूर कॉम्प्लेक्सकडून पश्चिम द्रुतगती महामार्गास जोडणारा महत्त्वाचा रस्ता असून वाहतुकीच्या दृष्टीने अतिशय वर्दळीचा आहे. सदर रस्त्यावर दुतर्फा लहान-मोठी वाहने अनधिकृतरीत्या पार्क केली जात असल्यामुळे पश्चिम द्रुतगती महामार्गाकडे जाणाऱ्या वाहनांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे.

आणि ज्याअर्थी, समता नगर वाहतूक विभागाने केलेल्या विनंतीचा विचार करता, ठाकूर कॉम्प्लेक्सकडून पश्चिम द्रुतगती महामार्गाकडे जाणारी वाहतूक सुरळीत राहण्यासाठी सदर रस्त्याच्या दोन्ही बाजूस कायमस्वरूपी 'नो पार्किंग' क्षेत्र घोषित करणे आवश्यक आहे, असे माझे मत झाले आहे.

त्याअर्थी, मी, मोक्षदा पाटील, अपर पोलीस आयुक्त, वाहतूक, मुंबई, मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम ११५ तसेच केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ५९ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून तसेच शासन निर्णय क्रमांक एमव्हीए-०५८९/प्र.क्र.१०६१/टीआर-२, दिनांक १९/०५/१९८९, एम.जी.जी. भाग ४-अ, दिनांक २०/०९/१९९० व शासन निर्णय क्रमांक एमव्हीए-००१९६/८७१/प्र.क्र.३७/सीआर-२, दिनांक २७/०९/१९९६, एम.जी.जी. भाग १-व्ही-अ (असाधारण) क्रमांक ३०७ अन्वये अधिसूचना निर्गमित दिनांकापासून खालीलप्रमाणे वाहतूक निर्बंध लागू करीत आहे.

आदेश

समता नगर वाहतूक विभागाच्या हद्दीतील **ठाकूर कॉम्प्लेक्स जंक्शन ते गौरव स्वीट्स हॉटेल, ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली (पूर्व), मुंबई या अंदाजे ८० मीटर लांबीच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूस सर्व प्रकारच्या वाहनांसाठी कायमस्वरूपी 'नो पार्किंग' क्षेत्र घोषित करण्यात येत आहे.**

ही अधिसूचना पोलीस, अग्निशमन दल, रुग्णवाहिका तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

सदर अधिसूचनेचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध मोटार वाहन अधिनियम, १९८८ तसेच इतर लागू असलेल्या कायद्यांनुसार योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

ही अधिसूचना माझ्या शिक्क्यासह व स्वाक्षरीसह दि. १२ /११/२०२६ रोजी मुंबई येथे जारी करण्यात येत आहे.

(मोक्षदा पाटील) भा.पो.से.
अपर पोलीस आयुक्त, वाहतूक
मुंबई शहर

Email – addlcp.traffic@mahapolice.gov.in
Phone Number –022-24924734

Govt. of
Maharashtra
Home Department
Mumbai Police



Office of the Additional Commissioner of Police, Traffic, Mumbai
Traffic Police Headquarters, 87, Sir Pochkhanwala Road, Worli, Mumbai - 400030

Outward No. 372 /TRF/Addl CP./R/Permanent Notification/2026, Dated: 12/11/2026

PERMANENT NOTIFICATION / ORDER

Notification No. 228 /TRF/Addl CP./R/Permanent Notification/2026, Dated: 12/11/2026

WHEREAS, the road stretch of approximately 80 metres between Thakur Complex Junction and Gaurav Sweets Hotel, Thakur Complex, Kandivali (East), Mumbai, falling within the jurisdiction of Samata Nagar Traffic Division, is very narrow and has a sharp curve. The said road is an important link connecting Thakur Complex to the Western Express Highway and carries heavy traffic. Small and large vehicles are being parked in an unauthorised manner on both sides of the said road, as a result of which vehicles proceeding towards the Western Express Highway from Thakur Complex are facing traffic congestion.

AND WHEREAS, having regard to the request made by Samata Nagar Traffic Division, and to keep the traffic proceeding from Thakur Complex towards the Western Express Highway moving smoothly, I am of the opinion that it is necessary to declare both sides of the said road as a permanent 'No Parking' Zone.

NOW, THEREFORE, I, Mokshada Patil, Additional Commissioner of Police, Traffic, Mumbai, in exercise of the powers conferred upon me under Section 115 of the Motor Vehicles Act, 1988, read with Rule 59 of the Central Motor Vehicles Rules, 1989, and in accordance with Government Resolution No. MVA-0589/CR-1061/TR-2, dated 19/05/1989, published in M.G.G. Part IV-A dated 20/09/1990, and Government Resolution No. MVA-00196/871/CR-37/CR-2, dated 27/09/1996, published in M.G.G. Part I-V-A (Extraordinary), No. 307, hereby impose the following traffic restrictions with effect from the date of issuance of this notification.

ORDER

Both sides of the road of approximately 80 metres from Thakur Complex Junction to Gaurav Sweets Hotel, Thakur Complex, Kandivali (East), Mumbai, within the jurisdiction of Samata Nagar Traffic Division, are hereby declared as a permanent 'No Parking' Zone for all types of vehicles.

This notification shall not apply to police, fire brigade, ambulance and other emergency service vehicles.

Legal action shall be taken against motorists violating this notification under the Motor Vehicles Act, 1988 and other applicable laws.

This notification is issued under my hand and seal at Mumbai on this 12th day of November, 2026.



(Mokshada Patil) IPS
Additional Commissioner of Police,
Traffic, Mumbai.

Email – addlcp.traffic@mahapolice.gov.in
दूरध्वनी क्रमांक – ०२२-२४९२४७३४

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
मुंबई पोलीस



अपर पोलीस आयुक्त, वाहतूक, बृहन्मुंबई यांचे कार्यालय

वाहतूक पोलीस मुख्यालय, ८७, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई – ४०००३०.

जा. क्र. - ३७२ /अपोआ/वाहतूक/वा./कायमस्वरूपी अधिसूचना/२६, दिनांक – १२ /११/२०२६

:: वार्तापत्र ::

समता नगर वाहतूक विभागाच्या हद्दीतील ठाकूर कॉम्प्लेक्स जंक्शन ते गौरव स्वीट्स हॉटेल, ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली (पूर्व), मुंबई हा अंदाजे ८० मीटर लांबीचा रस्ता अत्यंत अरुंद असून सदर रस्त्याला तीव्र वळण आहे. ठाकूर कॉम्प्लेक्सकडून पश्चिम द्रुतगती महामार्गास जोडणाऱ्या या वर्दळीच्या रस्त्यावर दुतर्फा वाहने अनधिकृतरीत्या पार्क केली जात असल्यामुळे वाहतूक कोंडी होत आहे.

त्यामुळे ठाकूर कॉम्प्लेक्सकडून पश्चिम द्रुतगती महामार्गाकडे जाणारी वाहतूक सुरळीत राहण्यासाठी सदर रस्त्याच्या दोन्ही बाजूस सर्व प्रकारच्या वाहनांसाठी **कायमस्वरूपी 'नो पार्किंग' क्षेत्र** घोषित करण्यात येत आहे.

सदर वाहतूक निर्बंध अधिसूचना निर्गमित दिनांकापासून लागू राहतील. पोलीस, अग्निशमन दल, रुग्णवाहिका तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना सदर निर्बंध लागू राहणार नाहीत.

सर्व वाहनचालकांनी वाहतूक पोलिसांनी दिलेल्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.



(मोक्षदा पाटील) भा.पो.से.
अपर पोलीस आयुक्त, वाहतूक
मुंबई शहर

Email – addlcp.traffic@mahapolice.gov.in
Phone Number –022-24924734

Govt. of
Maharashtra
Home Department
Mumbai Police



Office of the Additional Commissioner of Police, Traffic, Mumbai
Traffic Police Headquarters, 87, Sir Pochkhanwala Road, Worli, Mumbai - 400030

Outward No. 372 **/TRF/Addl CP./R/Permanent Notification/2026,** **Dated:** 12 **/11/2026**

:: PRESS NOTE ::

The road from Thakur Complex Junction to Gaurav Sweets Hotel, Thakur Complex, Kandivali (East), Mumbai, within the jurisdiction of Samata Nagar Traffic Division, is very narrow and has a sharp curve. Vehicles are being parked in an unauthorised manner on both sides of this busy road, which connects Thakur Complex to the Western Express Highway, resulting in traffic congestion.

In order to keep the traffic proceeding from Thakur Complex towards the Western Express Highway moving smoothly, both sides of the said road are being declared a **permanent 'No Parking' Zone** for all types of vehicles.

These restrictions will come into force from the date of issuance of the notification. They shall not apply to police, fire brigade, ambulance and other emergency service vehicles.

All motorists are requested to cooperate by following the instructions issued by the Traffic Police.

Addl Commissioner of Police Mumbai

(Mokshada Patil) IPS
Additional Commissioner of Police,
Traffic, Mumbai.